महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-१९ ऑगस्ट, २०२१

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:-ऑनलाईन अर्जप्रणाली-खाते अद्ययावत करण्यात उमेदवारांना येत असलेल्या अडचणींबाबत**
संदर्भ:- दिनांक २७ मे, २०२१ व दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsconline.gov.in ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत करण्यासंदर्भात आयोगाच्या दिनांक २७ मे, २०२१ व दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये सूचना करण्यात आली होती. सदर सूचनांस अनुसरुन खाते अद्ययावत करत असताना जुन्या खात्यामध्ये नोंदविण्यात आलेला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी चुकीचे नोंदविल्याने किंवा ज्ञात नसल्याने किंवा दोन्ही बंद असल्याने ओटीपी प्राप्त होण्यास व पर्यायाने पासवर्ड बदलण्यामध्ये उमेदवारांना अडचण येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

२. पासवर्ड बदलून खाते अद्ययावत करता येत नसल्यामुळे मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी बदलून मिळावा याकरीता उमेदवारांकडून आयोगाच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असल्याचे व मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असलेल्या कॉल्समुळे सदर टोल फ्री क्रमांक सतत व्यस्त राहत असल्याने आयोगाच्या सुविधा केंद्राकडून उमेदवारांना इच्छित सेवा पुरविण्यात अडथळे येत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येते. यास्तव, उमेदवारांना स्वत: ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अद्ययावत करण्याबाबतची सुविधा पुढील सप्ताहापासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर सुविधा उपलब्ध झाल्यानंतर उमेदवारांना स्वत: खाते अद्ययावत करता येईल.

३. खाते अद्ययावत करण्यात उमेदवारांना येत असलेल्या अडचणी विचारात घेता उमेदवारांना आश्वस्त करण्यात येते की, दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी नियोजित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० करीता प्रवेशप्रमाणपत्र नवीन संकेतस्थळावरील उमेदवारांच्या खात्याव्यतिरिक्त अन्य सुयोग्य पध्दतीने सर्व उमेदवारांना सुलभपणे उपलब्ध होईल, अशी व्यवस्था करण्यात येत आहे.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.